# सैनिक शाळेत शिकणाऱ्या विजाभज, विमाप्र विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याबाबत योजना

1. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई, क्रमांक-ईबीसी 1074/ 56423/डी-5, दि.6 ऑगस्ट,1976.
2. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई, क्रमांक-संकीर्ण 2002/ प्र.क्र.371/ मावक-3, दिनांक 5 ऑगस्ट,2003.
3. शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय,मुंबई, क्रमांक-इबीसी 2003/प्र.क्र.184/ मावक-2, दिनांक 17 संप्टेंबर, 2003.

## योजनेचा उद्देश :

1. विजाभज व विमाप्र वर्गाच्या विद्यार्थ्यांना सैनिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देणे.
2. सैनिक प्रशिक्षण घेऊन पोलीस व सैन्य भरतीत नोकरीची संधी उपलब्ध करून देणे.
3. विद्यार्थ्यांना शैक्षणिक बाबींसाठी आर्थिक सहाय्य उपलब्ध करून देणे.

## योजनेच्या अटी :-

1. विद्यार्थी हा विमुक्त जाती / भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील असावा.
2. प्रवेशिताच्या पालकाचे वार्षिक उत्पन्न रुपये 1 लाख च्या मर्यादेत असावे.
3. प्रवेशित हा शासनमान्य शिक्षण संस्थेत शिक्षण घेत असला पाहिजे.

## लाभाचे स्वरुप :-

सातारा सैनिक शाळा, भोसला मिलीटरी स्कुल, नाशिक व एस.एस.पी.एम.एस सैनिक शाळा, पुणे या 3 शाळातील विजाभज व विमाप्र विद्यार्थ्यांना भोजन, कपडे निवासी शिक्षण फी परिक्षा फी, क्रिडा घोडेस्वार व पॉकेट मनीसाठी संपूर्ण खर्च शासन देते. राज्यातील शासन मान्य सैनिक शाळांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विजाभज/विमाप्र विद्यार्थ्यांना प्रति विदयार्थी रु.15,000/- प्रमाणे निर्वाह भत्ता देण्यात येतो.

## संपर्क :-

1. संबंधित जिल्हयाचे समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद
2. संबंधित विदयालयाचे मुख्याध्यापक

सैनिकी शाळेतील विशेष मागासवर्ग प्रवर्गाच्या
विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याबाबत...

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग,**
शासन निर्णय क्रमांक -संकीर्ण-२००२/प्र.क्र.३७१/मावक-३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
**दिनांक : ५ ऑगस्ट, २००३**

**प्रस्तावना:-** सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या अनुसूचित जातीच्या व विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना **शासन निर्णय क्रमांक: ईबीसी-१०७४/५६४२३/डी -५, दिनांक ६ ऑगस्ट, १९७६ अन्वये निर्वाह भत्ता देण्याची योजना** लागू केलेली आहे व त्यामध्ये वेळोवेळी सुधारणा करण्यात आली आहे. त्याच धर्तीवर सदरहू योजना विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना लागू करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:-** याबाबत विचार करुन सैनिकी शाळेत शिक्षण घेणाऱ्या विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना, अनुसूचित जातीच्या व विमुक्त जाती भटक्या जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याच्या योजनेच्या धर्तीवर सन २००३-०४ या शैक्षणिक वर्षापासून लागू करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. सदर निर्वाह भत्ता देण्यासाठी येणारा खर्च तातडीची गरज म्हणून आकस्मिकता निधीमधून अग्रिम म्हणून रु. ३,२३,४००/- (रुपये तीन लाख, तेवीस हजार चारशे फक्त ) शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक :- आकनि-११.०३/०४३/अर्थसंकल्प-५, दिनांक ४ ऑगस्ट, २००३ (संगणक संकेतांक क्रमांक: ८०००-०४३-५) अन्वये आकस्मिकता निधीतून मंजूर करण्यात येत आहे. हा क्रमांक खर्चाच्या देयकावर तांबडया शाईने लिहून अधोरेखित करावा. याबाबतचे विवरणपत्र वित्त विभाग तसेच सह संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई यांना पाठवावे.

३. या बाबीवर होणारा खर्च " २२२५-अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण-०३-मागासवर्गीयांचे कल्याण-२७७ शिक्षण पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (राज्य योजनांतर्गत योजना) (०२)(११) सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता (२२२५-०८६-२) ४० शिष्यवृत्त्या/विद्यावेतने-मागणी क्रमांक : एन-४" या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून प्रतिवर्षी करण्यात येणा-या मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा.

४. यासाठी संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

कृ.मागे पहा.....

५.     हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक: क्र.६१३/०३/ व्यय-१४, दिनांक १६.७.२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

वैअपारकर

(वै.अ.पारकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति
मा. राज्यपालांचे सचिव,
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव,
मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
प्रधान सचिव, शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
संचालक, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, म.रा,पुणे
संचालक, लेखा व कोषागरे, मुंबई
वित्त विभाग, (कार्यासन: व्यय १४/अर्थसंकल्प-३/५) मंत्रालय, मुंबई ३२
उपसंचालक, शिक्षण
सर्व मंत्रालयीन विभाग
सर्व विभागीय समाज कल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी
सर्व शिक्षणाधिकारी
त्यांना कळविण्यात येते की, सदर शासन निर्णयाची प्रत सर्व शासन मान्य सैनिकी शाळांना त्यांनी त्यांच्या स्तरावरुन निर्गमित करावी.
महालेखापाल, महाराष्ट्र - १/२ (लेखा परीक्षा, लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई
सर्व कोषागार अधिकारी, मुंबई
सर्व उप सचिव/अवर सचिव/कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय,सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.

निवड नस्ती , मावक -३

**महाराष्ट्रातील सैनिकी शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता देण्याची योजना**
**निर्वाह भत्ता व उत्पन्न मर्यादेत वाढ करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा व विशेष सहाय्य विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः- इबीसी-२००३/प्र.क्र.१८४/मावक २**
**मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२.**
**दिनांक : १७ सप्टेंबर, २००३**

18 SEP 2003

**वाचा :-** १) शासन निर्णय, समाज कल्याण व क्रीडा विभाग क्रमांक :इबीसी-१०७७/२६२५४/- डेस्क-५, दिनांक १/८/१९७८
२) शासन निर्णय, समाज कल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्रमांक : इबीसी-१०९१/१२८७/प्र.क्र.१३/मावक-२, दि.३०/४/९४
३) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : इसैशा-१०९५/(२७८/९५)/माशि-७, दिनांक २९/९/९५
४) शासन निर्णय, शालेय शिक्षण विभाग क्रमांक : इसैशा-२००१/(१८५/०१)/माशि-७, दिनांक ५/७/२००२

**प्रस्तावना :-** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना शासकीय सैनिक स्कूल, सातारा, श्री. शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेण्याकरीता निर्वाह भत्ता मंजूर करण्याची योजना सन १९७६-७७ पासून राबविण्यात येत आहे. तसेच वरील संदर्भीय क्र.३ मधील शासन निर्णयान्वये शालेय शिक्षण विभागाने परवानगी दिलेल्या खाजगी स्वयंसेवी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणा-या सैनिकी शाळांमधून शिक्षण घेणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता मंजूर करण्यात येतो. ज्या पालकांचे उत्पन्न रु.१५००/- दरमहा च्या कमाल मर्यादेत आहे, अशा पालकांच्या मुलांना वरील योजनेचा लाभ देण्यात येतो. विद्यार्थ्यांना देण्यात यावयाच्या निर्वाह भत्यात वाढ करणे तसेच पालकांच्या उत्पन्न मर्यादेत वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :- अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती व भटक्या जमातीच्या विद्यार्थ्यांना सैनिक स्कूल, सातारा, श्री. शिवाजी प्रिपरेटरी मिलिटरी स्कूल, पुणे व भोसला मिलिटरी स्कूल, नाशिक या सैनिकी शाळेत शिक्षण घेण्याकरीता या शाळांमधून प्रचलित दराने आकारण्यात येणाऱ्या संपूर्ण खर्चाची रक्कम तसेच शालेय शिक्षण विभागाने परवानगी दिलेल्या खाजगी स्वयंसेवी व्यवस्थापनामार्फत चालविण्यात येणा-या सैनिकी शाळांमधून शिक्षण घेणाकरीता शालेय शिक्षण विभागाने संदर्भ क्र.४ येथील शासन निर्णयान्वये निर्धारित केलेल्या वार्षिक शुल्काची रक्कम रु.१५,०००/- संबंधित संस्थेस अदा करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

२. भारत सरकार शालांत परीक्षोत्तर शिष्यवृत्तीकरीता केंद्र शासनाने निर्धारित केल्यानुसार ज्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न रु.६५,२९०/- च्या कमाल मर्यादेत आहे. अशा मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ देण्यास शासन मंजूरी देत आहे.

३. वर परिच्छेद १ अन्वये योजनेचा लाभ घेणारे मागासवर्गीय विद्यार्थी या व्यतिरिक्त इतर शिष्यवृत्ती, शिक्षण शुल्क , परीक्षा शुल्क व इतर शुल्क मंजूर करणे या योजनांचा तसेच केंद्र व राज्य शासनाच्या इतर कोणत्याही शैक्षणिक योजनांचा लाभ घेण्यास पात्र राहणार नाहीत.

४. याबाबत होणारा खर्च " मागणी क्रमांक एन-४, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१, अनुसूचित जातींचे कल्याण, २७७, शिक्षण, पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (विघयो) राज्य योजनांतर्गत योजना (०४) (१२) सैनिकी शाळेत प्रशिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना परिरक्षण भत्ता (२२२५ ०४५ ९) " या अर्थशिर्षाखाली खर्ची घालून त्याखाली केलेल्या चालू आर्थिक वर्षाच्या तरतूदीमधून भागविण्यात यावा.

५. सदरहू शासन निर्णय वित्त विभागाच्या संमतीने त्या विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५३३/०३/व्यय-१५, दिनांक २३/६/२००३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने ,

( नं. मा. शिलवंत )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव.
मा.मुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव.
मा.मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक.
प्रधान सचिव, वित्त विभाग.
सचिव, शालेय शिक्षण विभाग.
सर्व मंत्रालयीन विभाग.-
महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई (प्रसिध्दीसाठी)
संचालक, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
संचालक, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी
सर्व समाजकल्याण अधिकारी, गट-अ, जिल्हा परिषद
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा परीक्षा / लेखा अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी

ISSUED
18 SEP 2003